निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
सोमवार
२६ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३३२ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## संक्षिप्त

### जालना जिल्हा नियोजन समितीची आज बैठक; पालकमंत्री पंकजा मुंडे करणार विकास कामांचा आढावा

**आत्ताच एक्सप्रेस / जालना/प्रतिनिधी**/प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून उद्या, २६ जानेवारी २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या विकास आराखड्यावर चर्चा करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीची (उझउ) महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडणार आहे.स्थळ: नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.वेळ: दुपारी १:०० वाजता.बैठकीतील मुख्य चर्चेचे मुद्दे:या बैठकीत जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने खालील महत्त्वाच्या विषयांवर निर्णय घेतले जातील.१. मागील निर्णयांचा आढावा: १४ जून २०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे आणि त्या बैठकीतील निर्णयांवर आतापर्यंत काय कार्यवाही झाली, याचा अनुपालन अहवाल सादर केला जाईल. २. निधी खर्चाचा आढावा: सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत आतापर्यंत झालेल्या खर्चाचा सविस्तर आढावा घेतला जाईल. ३. नवीन आराखड्यास मंजुरी: सन २०२६-२७ या आगामी वर्षासाठीच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या प्रारुप आराखड्यास या बैठकीत मान्यता देण्यात येणार आहे. ४. पुनर्विनियोजन: सन २०२५-२६ च्या चालू आर्थिक वर्षातील निधीच्या पुनर्विनियोजनास मंजुरी दिली जाईल, ज्यामुळे आवश्यक कामांसाठी निधी उपलब्ध करून देणे सोपे होईल. ५. ऐन वेळेचे विषय: अध्यक्षांच्या परवानगीने जिल्ह्यातील इतर तातडीच्या प्रश्नांवरही यावेळी चर्चा होण्याची शक्यता आहे.जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न झाल्यानंतर पालकमंत्री पंकजा मुंडे पत्रकार परिषद घेणार आहेत. यामध्ये बैठकीत घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय आणि जिल्ह्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीबाबत त्या प्रसारमाध्यमांशी संवाद साधतील. ही माहिती जिल्हा नियोजन अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. या बैठकीस जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती असणार आहे.

### फुलंब्री शहरात मकर संक्रांतीनिमित्त हळदी-कुंकू समारंभ उत्साहात संपन्न; महिलांचा मोठा प्रतिसाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/प्रतिनिधी**/भारतीय संस्कृतीमध्ये सण-उत्सवांना विशेष महत्त्व असून, हे सण सामाजिक एकोपा वाढवण्याचे काम करतात. याच परंपरेचे जतन करत फुलंब्री शहरात मकर संक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर हळदी-कुंकू समारंभाचे शानदार आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शहरातील महिलांनी पारंपरिक वेशभूषेत मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्साहात सहभाग नोंदवला.



फुलंब्री येथील वॉर्ड क्रमांक १०, बाजार गल्ली परिसरातील एका सोसायटीच्या प्रांगणात हा सोहळा संपन्न झाला. गुरुवार, दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत पार पडलेल्या या कार्यक्रमात महिलांनी एकमेकींना हळद-कुंकू लावून शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थितांना वाण वाटप करण्यात आले, ज्यामुळे वातावरणात एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला.

कार्यक्रमाचे आयोजन माजी सभापती तथा माजी नगरसेविका अश्विनी वाल्मीक जाधव यांच्या वतीने करण्यात आले होते. केवळ धार्मिक विधी म्हणून नव्हे, तर समाजातील महिलांनी एकत्र येऊन विचारांची देवाणघेवाण करावी आणि आपापसातील स्नेहबंध अधिक घट्ट व्हावेत, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले.मकर संक्रांतीचा सण हा तिळगुळासारखा गोडवा वाढवणारा सण आहे. आजच्या धावपळीच्या युगात महिलांना एकत्र येण्यासाठी आणि आपली संस्कृती जपण्यासाठी असे कार्यक्रम आवश्यक आहेत, असे मत अश्विनी जाधव यांनी व्यक्त केले.

बाजार गल्ली आणि परिसरातील शेकडो महिला भगिनींनी या सोहळ्याला हजेरी लावली होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजिका अश्विनी जाधव यांनी उपस्थित सर्व महिलांचे आभार मानले.

## 'हिंद-दी-चादर' गुरु तेग बहादूर साहिबजींच्या बलिदानातून मानवी मूल्यांच्या रक्षणाची प्रेरणा: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड/ प्रतिनिधी**/ 'हिंद-दी-चादर' गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी दिलेले बलिदान हे केवळ एका धर्मासाठी नसून मानवी मूल्ये, देशाची संस्कृती आणि विचारधारेच्या रक्षणासाठी होते. त्यांचे विचार आणि पराक्रमाचा इतिहास महाराष्ट्रातील घराघरात पोहोचविण्याचा संकल्प राज्य शासनाने केला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.नांदेड येथील मोदी मैदानावर आयोजित श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

नऊ समाजांचे ऐतिहासिक एकत्रीकरण: श्री गुरु नानक देवजींच्या विचारांवर श्रद्धा असणारे नऊ समाज प्रथमच लाखोंच्या संख्येने एकत्र आले आहेत. हा कार्यक्रम समाजाला जोडणारा दुवा ठरला आहे.शालेय अभ्यासक्रमात समावेश: शीख गुरूंचा गौरवशाली इतिहास आणि त्यांचे शौर्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी शालेय अभ्यासक्रमात त्यांचा समावेश करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.महाराष्ट्र-पंजाब अतूट नाते: संत नामदेव महाराजांचे विचार 'गुरु ग्रंथ साहिब'मध्ये समाविष्ट असल्याने वारकरी परंपरा आणि शीख समाज यांचे नाते अभेद्य झाले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरु तेग बहादूरजींच्या निर्भय आचरणाचा गौरव केला. जुलमी शासकांविरुद्ध धार्मिक स्वातंत्र्यासाठी दिलेले हे बलिदान अभूतपूर्व आहे. त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन आणि जनकलयाणाची जी कामे केली, ती आजही प्रेरणादायी आहेत, असे ते म्हणाले.

आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठीतून करून उपस्थितांची मने जिंकली. तरुणांनी गुरु तेग बहादूरजींच्या जीवनाचा आदर्श घेऊन देशाला अखंड ठेवण्यासाठी कटिबद्ध व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

या सोहळ्यात दिल्लीचे मंत्री सरदार मनजिंदर सिंघ सिरसा, संत ज्ञानी हरनाम सिंघ आणि गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ यांनीही विचार मांडले. पंतप्रधान नरेंद्र मोदींचा गुरु तेग बहादूरजींचा इतिहास जगासमोर आणण्याचा विचार मुख्यमंत्री फडणवीस प्रत्यक्षात उतरवत असल्याबद्दल सिरसा यांनी आभार मानले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री गुरु ग्रंथ साहिबजींचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'पंच प्यारे' यांचा विशेष सन्मान करण्यात आला. लाखो भाविकांच्या उपस्थितीने नांदेडची भूमी भक्तिमय आणि ऊर्जावान झाली होती.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शरदराव ढोले यांनी केले, तर आभार प्रदर्शन राज्य समन्वयक रामेश्वर नाईक यांनी केले.

## रक्ताळलेली मैत्री!

### बहिणीला चिठ्ठी दिल्याच्या रागातून मित्राचा काळजावर वार; पारनेरमध्ये थरार

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** मैत्रीच्या नात्याला काळीमा फासणारी एक अत्यंत संतापजनक आणि क्रूर घटना जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील पारनेर येथे घडली आहे.






ज्या मित्रासोबत बालपण गेले, ज्याच्यासोबत गल्लीत खेळलो, त्याच मित्राने किरकोळ कारणावरून आपल्याच मित्राचा निर्घृण खून केल्याने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. 'बहिणीला चिठ्ठी का दिली?' या एकाच रागातून राहुल खरे या नराधमाने पवन संतोष बोराटे या तरुणाचा चाकूने भोसकून जीव घेतला.मिळालेल्या माहितीनुसार, मृत पवन आणि आरोपी राहुल हे दोघेही एकाच गल्लीत राहणारे मित्र होते. मात्र, पवनने राहुलच्या बहिणीला चिठ्ठी दिल्याच्या संशयावरून त्यांच्यात गेल्या काही दिवसांपासून धुसफूस सुरू होती. यापूर्वीही त्यांच्यात याच कारणावरून खटके उडाले होते. मात्र, हा वाद इतक्या टोकाला जाईल आणि रक्ताचा पाट वाहेल, अशी पुसटशी कल्पनाही कोणाला नव्हती.शुक्रवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास, जेव्हा गाव शांत होत होते, तेव्हा राहुल खरे याने पवनच्या घरात घुसून त्याच्यावर हल्ला केला. वादावादीचे रूपांतर हाणामारीत झाले आणि संतापलेल्या राहुलने सोबत आणलेल्या धारदार चाकूने पवनच्या छातीवर आणि पोटावर सपासप वार केले.

घराचा उंबरठा रक्ताने माखला!

हल्ला इतका भीषण होता की, पवनला सावरण्याची संधीही मिळाली नाही. रक्ताच्या थारोळ्यात कोसळलेल्या पवनला पाहून गावकऱ्यांनी त्याला तातडीने रुग्णालयात नेले, मात्र वाटेतच त्याची प्राणज्योत मालवली. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित करताच पारनेर गावावर शोककळा पसरली. एका क्षणाच्या रागाने एका तरुणाचा जीव गेला आणि एका हसत्या-खेळत्या कुटुंबाचा आधार कायमचा हिरावला गेला.घटनेची गांभीर्य ओळखून अंबड पोलीस ठाण्याचे अधिकारी संतोष घोडके, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गुरले यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून आरोपी राहुल खरे याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.मैत्री की शत्रुत्व? असा सवाल आता गावकरी विचारत आहेत. एकाच गल्लीत राहणाऱ्या मुलांनी एकमेकांच्या जिवावर उठावे, या घटनेमुळे सामाजिक स्वास्थ्य धोक्यात आले आहे.

## बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा; सामाजिक कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल!




**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे-बीड/प्रतिनिधी**/ राज्याच्या राजकारणातील रणरागिणी आणि जनसामान्यांच्या प्रश्नांवर सदैव आवाज उठवणाऱ्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या कर्तृत्वाची मोहोर आता शैक्षणिक क्षेत्रातही उमटली आहे. पुणे येथील प्रतिष्ठित अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाने आज पंकजाताई मुंडे यांना शैक्षणिक क्षेत्रातील सर्वोच्च आणि अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी 'डी.लिट' (Doctor of Letters) पदवी प्रदान करून सन्मानित केले. या गौरव सोहळ्याने संपूर्ण बीड जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात आनंदाची लाट पसरली आहे.

**लोकसेवेचा आणि त्यागाचा सन्मान**

पंकजाताई मुंडे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक आणि राजकीय क्षेत्राच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. विशेषतः दीन-दलितांच्या, कष्टकऱ्यांच्या आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी घेतलेले कष्ट आणि राबवलेल्या लोकोपयोगी योजना यांची दखल घेऊन विद्यापीठाने त्यांना हा बहुमान दिला आहे. हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून, त्यांनी केलेल्या प्रचंड जनसेवेचा आणि त्यागाचा हा गौरव आहे.

**बीड जिल्ह्याची मान अभिमानाने उंचावली**

हा क्षण केवळ मुंडे परिवारासाठीच नव्हे, तर संपूर्ण बीड जिल्हावासियांसाठी अभिमानाचा आणि ऐतिहासिक ठरला आहे. ताईसाहेबांच्या कार्यकर्तृत्वाला मिळालेली ही पावती असून, त्यांच्या माध्यमातून आज जिल्ह्याचे नाव पुन्हा एकदा राज्याच्या आणि देशाच्या नकाशावर गौरवाने कोरले गेले आहे, अशा भावना समर्थकांकडून व्यक्त होत आहेत.

पंकजाताई मुंडे यांचे नेतृत्व हे नेहमीच आक्रमक आणि धडाडीचे राहिले आहे. आता त्यांच्या नावापुढे लागलेली 'डॉक्टर' ही पदवी त्यांच्या कामाला अधिक व्यापकता आणि वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देणारी ठरेल. संघर्षातून नेतृत्व उभ्या करणाऱ्या ताईसाहेबांना मिळालेला हा सन्मान त्यांच्या पुढील वाटचालीस नवी ऊर्जा देणारा ठरणार आहे.

## अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जालना जिल्ह्याची ३० जानेवारीला महत्त्वाची बैठक; संघटनात्मक बांधणीवर होणार मंथन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/ ग्राहकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी सदैव तत्पर असलेल्या अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची जालना जिल्हा संघटनात्मक बैठक येत्या ३० जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली आहे. स्थानिक विश्रामगृह (Guest House), जालना येथे दुपारी २:०० वाजता ही बैठक पार पडणार असून, यामध्ये संघटनेचा विस्तार आणि आगामी धोरणांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जाणार आहेत.

ही बैठक देवगिरी प्रांत अध्यक्ष डॉ. विलास मोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होईल. या प्रसंगी जालना जिल्ह्याचे प्रभारी ओंकार जोशी आणि संघटनमंत्री ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील ग्राहक चळवळीला अधिक गती देण्यासाठी पुढील रणनीती आखली जाईल.

या बैठकीत प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. कामाचा आढावा: मागील काळात संघटनेमार्फत राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा व कामांचा सविस्तर आढावा घेणे.संघटनात्मक बांधणी: जालना जिल्ह्यासह सर्व आठही तालुक्यांमध्ये संघटनेचे जाळे अधिक मजबूत करणे आणि नवीन सदस्यांची जोडणी करणे. जबाबदारी निश्चिती: संघटनेच्या नवीन कार्ययोजनेनुसार सक्षम पदाधिकाऱ्यांवर विशिष्ट जबाबदाऱ्या सोपवणे.

जालना जिल्ह्यातील आठही तालुक्यांतील आजी-माजी पदाधिकारी आणि ज्येष्ठ पदाधिकारी यांनी या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ड. डी. पी. पाटील (देवगिरी प्रांत कार्यकारिणी सदस्य), ड. मधुकरराव सोनवणे (जिल्हा मुख्य सल्लागार), डॉ. रमेश तारगे (जिल्हाध्यक्ष) आणि बालाप्रसाद जेथलीया (जिल्हा सचिव) यांनी केले आहे.ग्राहकांच्या हितासाठी आणि अन्याय निवारणासाठी ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

## श्री क्षेत्र भगवानगड येथे आमदार धनंजय मुंडे नतमस्तक; गडावरील भव्य विकासकामांची केली पाहणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**पाथर्डी (प्रतिनिधी)** पवित्र तीर्थक्षेत्र आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगड येथे माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी आज भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी गडाचे संस्थापक ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबा आणि संत भीमसिंह महाराज यांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.दर्शनानंतर धनंजय मुंडे यांनी गडाचे महंत न्यायाचार्य ह.भ.प. डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांची भेट घेतली. मुंडे यांनी शास्त्रीजींचे दर्शन घेऊन त्यांच्याकडून विशेष आशीर्वाद प्राप्त केले.यावेळी शास्त्री महाराजांनी त्यांना आध्यात्मिक व सामाजिक कार्याबाबत मौलिक मार्गदर्शन केले. उभयतांमध्ये गडाच्या परंपरा आणि भविष्यातील कार्यावर प्रदीर्घ चर्चा झाली.

> भगवानगड ही आपली मोठी ऊर्जा आहे. बाबांच्या चरणी नतमस्तक झाल्यावर एक वेगळीच शांती आणि शक्ती मिळते. गडावर सुरू असलेले मंदिर निर्माण आणि शैक्षणिक कार्य हे समाजासाठी दीपस्तंभ ठरेल.
>
> **- धनंजय मुंडे**

सध्या भगवानगडावर शास्त्री महाराजांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू आहेत. यामध्ये प्रामुख्याने संत ज्ञानेश्वर माऊलींच्या भव्य मंदिर निर्माणासह, आध्यात्मिक व शैक्षणिक संकुलाच्या उभारणीच्या कार्याचा समावेश आहे. आमदार मुंडे यांनी या सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. गडाचे पावित्र्य जपून सुरू असलेल्या या आधुनिक आणि भव्य कार्याचे त्यांनी कौतुक केले. या शैक्षणिक संकुलामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आध्यात्मिक शिक्षणासोबतच आधुनिक शिक्षणाची दारे उघडली जाणार आहेत.



या भेटीचे औचित्य साधून धनंजय मुंडे यांनी गडाच्या सर्वांगीण विकासावर शास्त्री महाराजांशी सविस्तर चर्चा केली. गडावर येणाऱ्या भाविकांच्या सोयीसुविधा, मंदिर परिसराचे सुशोभीकरण आणि शैक्षणिक प्रकल्पांची व्याप्ती वाढवण्यासाठी शासन स्तरावरून आणि वैयक्तिक पातळीवर सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही मुंडे यांनी यावेळी दिली.

## संपादकीय

### प्रजासत्ताक दिन म्हणजेच स्वतंत्र भारताची नियमावली

२६ जानेवारी संविधानाचा व नियमांचा आधारस्तंभ आहे.१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु स्वातंत्र्यानंतर संविधान, देशाची नियमावली असने गरजेचे असते.कारण कोणत्याही कार्याकरीता पुढे पाऊल टाकण्यास कायद्याच बंधन असने आवश्यक आहे.२६ जानेवारी १९५० रोजी देशाची राज्यघटना लागु झाली.त्यानिमित्याने भारतातील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतो.कारण प्रजासत्ताक म्हणजे लोकांव्दारे लोकांसाठी प्रस्थापित केलेले शासन. भारतात जात,धर्म, पंथ,वंश, गरीब-श्रीमंत, व्देष या संपूर्ण गोष्टी बाजूला ठेवून गुण्या-गोविंदाने प्रजासत्ताक दिवस वेगवेगळ्या संस्कृतीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची लॉर्ड माउंट बॅटन(गव्हर्नर जनरल) यांच्या जागी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली.२६ जानेवारीच्या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीतील राजपथावर राष्ट्रध्वज फडकवला जातो.आपण ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत.मुख्यत्वे करून २६ जानेवारीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना लागु करण्यात आली. त्यामुळे स्वतंत्र भारतासाठी हा मोठा आणि गौरवाचा दिवस मानल्या जातो.भारताला स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झाली असली तरी आजही देशात आपल्याला गुन्हेगारी, भ्रष्टाचार, बँक घोटाळे,झुंड बळी, जातीयवाद, हिंसाचार,यांच्याशी आजही आपण लढतोय ही स्वतंत्र भारतासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.अशा गुन्ह्या विरूद्ध सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. कारण देश स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी,भगतसिंग, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, चंद्रशेखर आझाद, हजारो क्रांतिकारक, मवाळवादी -जहालवादी, थोर महात्मे इत्यादीसह लाखो स्वतंत्र शुरविरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उदयास आला. भारताच्या थोर महात्म्यांना भारत स्वतंत्र करण्यासाठी दोन नद्यांचा सहारा घ्यावा लागला व त्या दोन नद्यांचा उगम म्हणजे एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच भारतीय स्वातंत्र्यलढा उभा झाला. याकरिता आपल्याला १५ ऑगस्ट१९४७ उजाडण्यासाठी तब्बल १५० वर्षे वाट पाहावी लागली.१५० वर्षांच्या काळातील स्वतंत्र विरांचे बलीदान व्यर्थ जावु नये व त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अस्तित्वात आणली.यात मुख्यत्वेकरून डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल,पंडित जवाहरलाल नेहरूसह अनेक थोर महात्म्यांचा सिंहाचा वाटा आहे.परंतु दु:खाची गोष्ट म्हणजे गेल्या ३० वर्षांपासून देशात भ्रष्टाचार, करोडोचे घोटाळे, बलात्कार, गुन्हेगारी,निवडणुकांमध्ये जातीयवाद याला मोठ्या प्रमाणात उत आल्याचे पहायला मिळते.ही शहिद विरांच्याप्रती अत्यंत दु:खद व चिंताजनक बाब आहे. आपल्या पुर्वजांनी व देशाच्या स्वतंत्र संग्राम सेनानींनी आणि बहादुर विरांनी घर-दार, परीवार या संपूर्ण गोष्टी बाजूला सारून व त्याग करून स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात उडी घेतली व लाखोंच्या संख्येने बलीदान दिले. परंतु आपली शोकांतिकाच म्हणावी लागेल की आपण भारत स्वतंत्र होऊन ७८ व्या वर्षीत पदार्पण करीत आहोत तरीही भारतातील भ्रष्टाचार थांबलेला नाही. आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांजवळ, पुंजीपतीं, वॉलीउडक्षेत्र व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांजवळ वाममार्गाने कमवीलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आजही आहे. ही संपत्ती एकत्र केली तर भारताला तब्बल १० वर्षे कोणाही जवळुन कर्ज घ्यावे लागणार नाही व गरीबी आणि महागाई संपुष्टात येवु शकते आणि देश सुजलाम - सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल.याकरिता भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढारी ही देशाला लागलेली कीड आहे ही कीड जळामुळासकट नष्ट व्हायला हवी व यावर आळा बसायला हवा.आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने व चलनात नसल्याने देशातील गरीब वर्ग गरीबीच्या खाईत जात आहे तर श्रीमंत वर्ग दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व देशाच्या विकासामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे. यामुळेच देशात महागाई व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते.भारताचे प्रजासत्ताक दिनाचे ७६ व्या वर्षाचे औचित्य साधून देशातील संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यावर कठोर कारवाई करून त्यांनी वाममार्गाने कमवीलेला पैसा सरकारने आपल्या तिजोरीत जमा करावा. यामुळे देशाचा विकास, बेरोजगारीची समस्या, महागाई यावर आळा घालण्यासाठी मोठी मदत होईल व देशाचा विकास भरभराटीला येईल.याचे स्वागत आपले पुर्वज,शहीद व स्वतंत्र सेनानी अवश्य करेल व त्यांच्या स्वतंत्र लढ्याला दिलासा अवश्य मिळेल हीच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहिदांना खरी आदरांजली ठरेल. देशात वाढते हवामानातील बदल, प्रदूषण व ग्लोबल वार्मिंगचा धोका पहाता.प्रजासत्तक दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. याकरीता शाळा, कॉलेज, संपूर्ण सरकारी क्षेत्र, राजकीय पुढारी, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घ्यायला हवा.यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होईल व प्रदूषणावर मात करण्यासाठी मोठी मदत मिळेल. आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर ती अनंतकाळापर्यंत सर्वांच्या ह्रदयात राहील व लाखो शुरविरांचे दर्शन प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला होईल. यामुळे भारतीय शहिदांची व शुरविरांची गाथा अबाध्य आहे.कारण त्यांच्या आशीर्वादानेच आपण आज मोकळा श्वास घेत आहोत.जय हिंद!

# प्रजासत्ताक दिन : केवळ सोहळा नव्हे, तर जबाबदारीची आठवण

२६ जानेवारी हा दिवस भारताच्या इतिहासात केवळ एका तारखेपुरता मर्यादित नाही. तो दिवस आहे भारतीय लोकशाहीच्या आत्म्याचा, संविधानाच्या सर्वोच्चतेचा आणि नागरिकांच्या सार्वभौमत्वाचा. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने स्वतःला प्रजासत्ताक घोषित केले आणि हजारो वर्षांच्या विषमतेच्या, अन्यायाच्या आणि गुलामगिरीच्या इतिहासाला वैचारिक छेद दिला. त्यामुळे प्रजासत्ताक दिन हा केवळ ध्वजारोहण, संचलन किंवा भाषणांचा सोहळा नसून, तो स्वतःला प्रश्न विचारण्याचा, आत्मपरीक्षणाचा आणि संविधानाशी नवी बांधिलकी जाहीर करण्याचा दिवस आहे. आज अमृतमहोत्सवोत्तर भारतात प्रजासत्ताक दिन साजरा करताना एक मूलभूत प्रश्न सतत डोकावतो की, आपण खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक आहोत का? प्रजासत्ताक म्हणजे सत्ता राजाच्या, धर्माच्या किंवा एखाद्या विशिष्ट वर्गाच्या हातात नसून संपूर्ण जनतेच्या हातात असणे. भारतीय राज्यघटनेने थश, ींहश झशेश्रिश ेष खपवळर या शब्दांनी सुरुवात करून ही भूमिका स्पष्ट केली. भारतात राजा नाही, धर्माधारित राज्य नाही; आहे ते फक्त संविधानाधिष्ठित लोकशाही राज्य. मात्र केवळ घटना स्वीकारल्याने प्रजासत्ताक साकारत नाही. ते जिवंत राहते ते न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चार स्तंभांवर.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट इशारा दिला होता की, राजकीय लोकशाही टिकवायची असेल तर सामाजिक आणि आर्थिक लोकशाही प्रस्थापित करावी लागेल. अन्यथा संविधान कागदावर राहील, वास्तवात नाही.

भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. पण त्याचे महत्त्व त्याच्या जाडीमुळे नाही, तर त्यात सामावलेल्या मानवी मूल्यांमुळे आहे. संविधानाने देशातील शेवटच्या माणसालाही हक्क दिले; आवाज नसलेल्यांना आवाज दिला; आणि सत्ता सत्ताधाऱ्यांच्या हातून काढून जनतेकडे दिली. मात्र आजच्या काळात संविधानाचा उल्लेख अनेकदा औपचारिकतेपुरता मर्यादित राहतो. संविधानावर प्रेम दाखवले जाते, पण त्याची आत्मा समजून घेण्याची तयारी कमी दिसते. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी संविधानाची शपथ घेतली जाते; पण वर्षभरात त्या शपथेचा विसर पडतो.

प्रजासत्ताक दिनी भव्य संचलन होते, शौर्य, शिस्त आणि विविधतेचे दर्शन घडते. भारताची लष्करी ताकद, सांस्कृतिक वैविध्य आणि वैज्ञानिक प्रगती याचे चित्रण केले जाते. हे सारे अभिमानास्पद आहे. पण त्याचवेळी, देशातील शेतकरी कर्जबाजारी आहेत, तरुण बेरोजगार आहेत, स्त्रिया असुरक्षित आहेत, दलित-आदिवासी अजूनही अन्याय सहन करत आहेत, आणि संविधानाने दिलेले मूलभूत हक्क अनेकदा कागदावरच राहतात. या विरोधाभासांवर प्रजासत्ताक दिनीही मोकळेपणाने चर्चा व्हायला हवी. कारण साजरीकरण आणि सत्य यामध्ये वाढत जाणारी दरी लोकशाहीसाठी धोक्याची ठरते. आज नागरिक म्हणून आपण हक्कांबाबत जागरूक झालो आहोत, ही सकारात्मक बाब आहे. मात्र त्याच वेळी संविधानातील कर्तव्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. मतदान करणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, विविधतेचा आदर करणे, ही सगळी लोकशाहीची मूलभूत पायाभरणी आहे. प्रजासत्ताक म्हणजे सरकारवर टीका करण्याचा अधिकार; पण तो अधिकार जबाबदारीने वापरण्याची नैतिकताही तितकीच महत्त्वाची आहे. अन्यथा स्वातंत्र्य अराजकतेत बदलण्याची भीती असते.

प्रजासत्ताक दिनाच्या ७५ वर्षांनंतरही जातीभेद, आर्थिक विषमता आणि लैंगिक अन्याय संपलेले नाहीत. संविधानाने समतेची हमी दिली, पण समाजमन अजूनही पूर्णपणे बदललेले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत सांगितले होते की, भारतात भक्तीची भावना राजकारणात आली, तर लोकशाही धोक्यात येईल. आज व्यक्तीपूजा, अंधनिष्ठा आणि द्वेषाचे राजकारण वाढताना दिसत असेल, तर तो प्रजासत्ताक मूल्यांसाठी गंभीर इशारा आहे. भारताचे प्रजासत्ताक हे धर्मनिरपेक्ष आहे. याचा अर्थ धर्मविरोधी नव्हे, तर सर्व धर्मांना समान वागणूक देणारे राज्य. पण अलीकडच्या काळात धर्माच्या नावावर समाजात ध्रुवीकरण वाढत असल्याचे चित्र आहे. प्रजासत्ताक दिन हा धर्म, जात, भाषा यांपलीकडे जाऊन भारतीय नागरिक म्हणून आपली ओळख पुन्हा अधोरेखित करण्याचा दिवस असायला हवा. अन्यथा प्रजासत्ताकाची संकल्पना हळूहळू कोसळण्याचा धोका नाकारता येत नाही.

भारताची लोकसंख्या तरुण आहे. ही तरुणाई प्रजासत्ताकाची सर्वात मोठी ताकद आहे. मात्र ती केवळ घोषणांमध्ये गुंतून न राहता, प्रश्न विचारणारी, चिकित्सक आणि जबाबदार बनली तरच लोकशाही मजबूत होईल. संविधान समजून घेणारी तरुण पिढीच प्रजासत्ताकाचे भवितव्य सुरक्षित ठेवू शकते. केवळ सोशल मीडियावरील देशभक्ती पुरेशी नाही; लोकशाहीचे भान आणि विवेक अधिक गरजेचा आहे. प्रजासत्ताक दिन हा वर्षातून एकदा साजरा करण्याचा कार्यक्रम नाही. तो दररोज जगायचा मूल्यांचा उत्सव आहे. संविधानाचे पालन, अन्यायाविरुद्ध उभे राहणे, दुर्बलांचा आवाज बनणे, हीच खरी प्रजासत्ताक दिनाची भावना आहे. आज गरज आहे ती ध्वजाला सलाम करताना संविधानालाही मनापासून स्वीकारण्याची. संचलन पाहताना समाजातील शेवटच्या माणसाची अवस्था लक्षात ठेवण्याची आणि अभिमानाबरोबर आत्मपरीक्षण करण्याची.

कारण भारत प्रजासत्ताक आहे, फक्त घटनात्मकदृष्ट्या नव्हे, तर मूल्यात्मकदृष्ट्याही आणि ही जबाबदारी आपली सगळ्यांची आहे.

या प्रजासत्ताक दिनी आपण केवळ ध्वजाला वंदन न करता संविधानाच्या मूल्यांनाही मनापासून स्वीकारू या. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही चार तत्त्वे फक्त शब्दांत नव्हे, तर आपल्या आचरणात, विचारात आणि निर्णयांत उतरवू या. प्रत्येक नागरिक जागरूक असेल, प्रत्येक आवाजाला सन्मान मिळेल आणि संविधान सर्वोच्च राहील, असाच समताधिष्ठित, विवेकी आणि मजबूत भारत घडवण्याचा संकल्प करू या. सर्वांना ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

**-प्रविण बागडे**
नागपूर

## नहार उद्योगसमूहाची गगनभरारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** येथील प्रसिद्ध नहार उद्योगसमूहाने इटलीतील विख्यात सागा ग्रुपसोबत भागीदारी केल्याने त्यांच्यावर उद्योगविश्वात अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सीएमआयएतर्फे अध्यक्ष उत्सव माछर यांनी नहार समूहाचे सुभाष नहार आणि हर्षल नहार यांचे अभिनंदन करताना हे आंतरराष्ट्रीय पातळीवरील यश असल्याचे अधोरेखित केले आहे.

साग नहार्स आटोटेक इंडिया प्रा.लि. असे या संयुक्त उद्योगाचे नाव असेल. आशिया आणि युरोप खंडातील ग्राहकांना अधिक समर्थपणे उच्च दर्जाची, आकर्षक व विकसित केलेली उत्पादने पुरविणे, हा या उद्योगसमूहांचा एकत्र येण्यामागचा हेतू आहे. यातून नहार समूहाच्या एका नव्या पर्वास प्रारंभ झाला आहे.

आधीच्या उत्पादनांसोबतच इव्ही आणि आयसीई पीव्हीसाठी हायड्रोलिक ट्युब, एक्झॉस्ट मॅनिफोल्ड्स व रबर होजेसची निर्मितीही हा उद्योगसमूह करणार आहे.

## नागपूरचे साहित्यिक प्रवीण बागडे व प्रभाकर सोमकुवर यांचा होणार गौरव

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर/संगमनेर (प्रतिनिधी)** कविता ही केवळ शब्दांची जुळवाजुळव नसून ती समाजाचे वास्तव मांडणारे आरसेपण आहे. याच विचाराने प्रेरीत होऊन 'कविता म्हणजे प्रबोधन, संगमनेर प्रतिष्ठान'च्या वतीने 'महोत्सव कवितांचा' आणि विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात नागपूरचे सुप्रसिद्ध साहित्यिक आणि कवी प्रवीण बागडे तसेच प्रभाकर सोमकुवर यांना त्यांच्या वाङ्मयीन योगदानाबद्दल गौरविण्यात येणार आहे.

हा भव्य साहित्यिक आणि सांस्कृतिक सोहळा रविवार, १ फेब्रुवारी २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील बोटा येथील श्री कचेश्वर देवस्थान मंदिर परिसरात संपन्न होणार आहे. या महोत्सवात संगमनेरसह राहुरी, पारनेर, जुन्नर, नागपूर आणि अकोला अशा विविध भागांतील निवडक साहित्यिक, कवी, विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग राहणार आहे.

**संगमनेरमध्ये रंगणार 'महोत्सव कवितांचा';**

या संमेलनाचे मुख्य आकर्षण म्हणून 'आधुनिक गाडगेबाबा' म्हणून ओळखले जाणारे डॉ. हरिभाऊ उगले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्षपद कृषी उपसंचालक श्री. प्रविण गवांदे भूषविणार आहेत. या महोत्सवातील काव्यसंमेलनात प्रवीण बागडे आपल्या प्रखर आणि संवेदनशील कवितांचे सादरीकरण करणार आहेत.

सामाजिक प्रश्नांची परखड मांडणी, आशयपूर्ण शब्दशैली आणि परिवर्तनवादी दृष्टिकोन ही बागडे यांच्या लेखणीची ताकद आहे.त्यांच्या कवितांनी नेहमीच वाचक आणि श्रोत्यांना अंतर्मुख केले असून, त्यांच्या निवडीमुळे या महोत्सवाची उंची अधिक वाढल्याची भावना साहित्य वर्तुळातून व्यक्त होत आहे.महोत्सवाचे आयोजक गौतम वाघमारे यांनी या उपक्रमामागची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, कवितेच्या माध्यमातून सामाजिक जाणीव जागृत करणे आणि नव्या दमाच्या प्रतिभावंतांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे.या गौरवास्पद निवडीबद्दल विदर्भातील साहित्यप्रेमी आणि रसिकांकडून प्रवीण बागडे व प्रभाकर सोमकुवर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## किनवटमध्ये 'दैनिक आत्ताच एक्सप्रेस' आणि 'मराठीबाणा न्यूज'च्या भव्य संपर्क कार्यालयाचे २८ जानेवारीला उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट (प्रतिनिधी)** पत्रकारितेच्या क्षेत्रातील निर्भीड आणि निष्पक्ष आवाज म्हणून ओळखले जाणारे 'मराठीबाणा न्यूज LIVE' आणि 'दैनिक आत्ताच एक्सप्रेस' आता अधिक ताकदीने जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी सज्ज झाले आहेत. किनवट-माहूर सह नांदेड,हिंगोली व परभणी जिल्हयातील जनतेसाठी आणि प्रशासकीय कामांसाठी अत्यंत महत्त्वाचे केंद्र ठरणारे या वृत्तसमूहाचे नवे भव्य संपर्क कार्यालय आता गोकुंदा (किनवट) येथे सुरू होत आहे. येत्या बुधवारी, २८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजता या कार्यालयाचा भव्य उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे.




आई-वडिलांच्या हस्ते होणार 'शुभारंभ' या उद्घाटन सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, कोणत्याही राजकीय नेत्याऐवजी श्री. नामदेवराव दादाराव मुंडे (बाबा) आणि सौ. रेवताबाई नामदेवराव मुंडे (आई) यांच्या शुभहस्ते या कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे. मातृ-पितृ चरणी कृतज्ञता व्यक्त करत पत्रकारितेचा हा नवा टप्पा गाठला जात असल्याने परिसरातून या निर्णयाचे कौतुक होत आहे.

या कार्यक्रमाला 'दैनिक आत्ताच एक्सप्रेस' व 'नोकरी एक्सप्रेस'चे मुख्य संपादक सुग्रीव सोपानराव मुंडे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तसेच किनवट आणि माहूर तालुक्यातील सर्व पत्रकार बांधव, सर्व लोकप्रतिनिधी, शासकीय विभागांचे सर्व कर्मचारी, व्यावसायिक बांधव आणि प्रधानसांगवी/दुधगाव येथील ग्रामस्थ मंडळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

जनतेच्या हक्काचे व्यासपीठ आता तुमच्या दारी! हा सोहळा यशस्वी करण्यासाठी आवृती संपादक लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे आणि सौ. गौरी लक्ष्मीकांत मुंडे (आवृत्ती संपादक: नांदेड-परभणी-हिंगोली) यांच्यासह मुंडे परिवाराने जय्यत तयारी केली आहे.

या उद्घाटन सोहळ्याला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन निमंत्रक लक्ष्मीकांत मुंडे आणि चंद्रकांत, सुर्यकांत व विष्णूकांत नामदेवराव मुंडे यांनी केले आहे.

**: कार्यक्रमाचा तपशील :**
**दिनांक:** बुधवार, २८ जानेवारी २०२६
**वेळ:** दुपारी ०२:०० वाजता
**स्थळ:** ग्रामीण रुग्णालय रोड, गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड.

## मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी 'अनोखी कल्पक जाहिरात निर्मिती स्पर्धा' जाहीर; २३ फेब्रुवारीपर्यंत संधी

आत्ताच एक्सप्रेस

नाशिक/प्रतिनिधी/यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'संवाद' पत्रिकेच्या वतीने विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना आणि सृजनशीलतेला वाव देण्यासाठी 'अनोखी कल्पक जाहिरात निर्मिती स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपली कल्पकता जाहिरातीच्या स्वरूपात मांडता येणार आहे.विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी प्रामुख्याने सामाजिक आणि शैक्षणिक अशा चार विषयांची निवड करण्यात आली आहे. स्पर्धकांना खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर आपली जाहिरात तयार करावी लागेल.ज्ञानगंगा घरोघरी - यशवाणी कानोकानी,मुक्त विद्यापीठातील शिक्षण - विकासाचे लक्षण,प्लास्टिक हटवा - पर्यावरण वाचवा,मुक्त विद्यापीठ - 'संवाद' पत्रिका,जाहिरात 'ए फोर' (-४) आकाराच्या कागदावर बहुरंगी भित्तीपत्रक (झ्रींशी) स्वरूपात असावी.जाहिरातीत आकर्षक मजकूर, लक्षवेधी चित्र आणि विषयाला सुसंगत घोषवाक्याचा समावेश असावा.तयार केलेली जाहिरात झऊऋ, गझएॠ किंवा झछॠ फॉरमॅटमध्ये असणे आवश्यक आहे.स्पर्धकांनी आपली जाहिरात paikraošvkycmou. digitaluniversity.ac या ई-मेल आयडीवर पाठवायची आहे. ई-मेल पाठवताना खालील माहिती नमूद करणे अनिवार्य आहे. अभ्यासकेंद्राचे नाव व केंद्र संकेतांक कायम नोंदणी ॣ मांक,पारितोषिके आणि सन्मान:गुणवत्तापूर्ण ठरणाऱ्या प्रथम पाच विजेत्यांना विशेष पारितोषिक, प्रमाणपत्र आणि ग्रंथ देऊन गौरविण्यात येईल.

## घर तिथे शिवसैनिक, गाव तिथे शाखा' ; केजमध्ये शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीवर भर-संगीताताई ठोंबरे

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज / प्रतिनिधी/** केज विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेची ताकद वाढवण्यासाठी आणि पक्ष संघटना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी शिवसेना उपनेत्या प्रा. सौ. संगीताताई विजयप्रकाश ठोंबरे यांच्या निवासस्थानी महत्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. घर तिथे शिवसैनिक आणि गाव तिथे शाखा हे ध्येय समोर ठेवून आगामी काळात कामाला लागा, असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

या बैठकीत केज विधानसभा मतदारसंघातील राजकीय परिस्थिती आणि आगामी रणनीतीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना संगीताताई ठोंबरे म्हणाल्या की, मतदारसंघातील प्रत्येक गावात शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांनी सज्ज व्हावे. जनसामान्यांच्या समस्या सोडवून पक्षाची विचारधारा घराघरात पोहोचवणे हेच आपले मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीस शिवसेनेचे दिग्गज नेते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रामुख्याने शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक युवासेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे,जिल्हा संघटक: योगेश नवले,विधानसभा प्रमुख: दादासाहेब ससाणे,तालुकाप्रमुख (केज)पृथ्वीराज पाटील,शहराध्यक्ष (केज) बालासाहेब पवार,तालुकाप्रमुख (अंबाजोगाई) अर्जुन भाऊ वाघमारे,शहराध्यक्ष (अंबाजोगाई) गणेश जाधव पक्षाच्या बांधणीत महिलांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगत, यावेळी महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनीही आपली भूमिका मांडली. यामध्ये महिला जिल्हा उपाध्यक्ष सौ. मीरा आडे, केज तालुकाप्रमुख सौ. जया राऊत, शहर प्रमुख सौ. वैशाली



सांगळे, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष सौ. सुनिता जाधव आणि शहराध्यक्ष सौ. तनुजा केदार यांच्यासह अन्य महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

बैठकीच्या शेवटी, उपस्थित सर्व शिवसैनिकांनी आणि युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केज मतदारसंघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला करण्यासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

'संस्कार दशसूत्रीचे रंग राष्ट्रभक्तीचे'

# प्रजासत्ताक दिनी छत्रपती संभाजीनगरमध्ये दीड लाख विद्यार्थ्यांचे सामूहिक कवायत संचलन



**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** सोमवारी, २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, शिस्त आणि संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी 'संस्कार दशसूत्रीचे, रंग देशभक्तीचे' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ३५ ठिकाणी एकाच वेळी सुमारे १ लाख ५० हजार विद्यार्थी देशभक्तीपर गीतांच्या तालावर सामूहिक कवायत सादर करणार आहेत.

राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम राज्यभर राबविला जात आहे. 'राष्ट्र प्रथम' या टॅगलाईनखाली होणाऱ्या या ऐतिहासिक उपक्रमात राज्यातील १ लाख शाळांमधील ७ लाख शिक्षक आणि जवळपास अडीच कोटी विद्यार्थी सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे, या भव्य उपक्रमाची नोंद 'थीश्रव इेज्ञ ेष ठशलेंवी' मध्ये करण्यात येणार आहे.जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या 'दशसूत्री' उपक्रमातील 'राष्ट्रभक्ती जागृत करणे' या सूत्राचा हा एक भाग आहे. माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती आश्विनी लाठकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील प्रमुख तीन ठिकाणी मोठे संचलन होईल:

राजे संभाजी सैनिकी स्कूल, कांचनवाडी,पोलीस अधीक्षक ग्रामीण कार्यालय, टीव्ही सेंटर,PES शारीरिक शिक्षण महाविद्यालय, नागसेन वन छावणी,जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज स्वतः या मैदानांना भेट देऊन व्यवस्थेची पाहणी केली आहे.

या उपक्रमात सर्व विद्यार्थी एकाच वेळी १४ मिनिटांच्या देशभक्तीपर गीतांवर शिस्तबद्ध कवायत सादर करतील. केवळ शब्दांतून नव्हे तर कृतीतून राष्ट्रप्रेम व्यक्त व्हावे, हा यामागचा मुख्य हेतू आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षण विभागासह महसूल, आरोग्य, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा समन्वय साधत आहेत. विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि शिस्त याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.या सामूहिक कवायत संचलनातून विद्यार्थ्यांमध्ये समन्वय, संघभावना आणि राष्ट्रध्वजाप्रती आदर निर्माण होईल, असा विश्वास शिक्षण विभागाने व्यक्त केला आहे.




# प्रतापूरवाडी येथील सुगराबी बाबन पटेल यांचे वृद्धापकाळाने निधन

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर (प्रतिनिधी)**
गंगापूर तालुक्यातील प्रतापूरवाडी येथील ज्येष्ठ नागरिक सुगराबी बाबन पटेल (वय ९५) यांचे शनिवार, २४ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने प्रतापूरवाडी व परिसरात शोककळा पसरली आहे.सुगराबी पटेल यांच्या पार्थिवावर त्याच दिवशी दुपारी ३ वाजता प्रतापूरवाडी येथील कब्रस्तानमध्ये शोकाकुल वातावरणात दफनविधी पार पडला. यावेळी पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सुगराबी पटेल यांचा परिवार तालुक्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय आहे.
त्या:प्रतापूरवाडीचे पोलीस पाटील युसुफ पटेल आणि सरपंच अब्दुल पटेल यांच्या मातोश्री होत्या.लासूर स्टेशन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक ताहेर पटेल यांच्या



आजी होत्या.

त्यांच्या पश्चात ५ मुले, सुना, नातवंडे, पुतणे असा मोठा आणि विस्तारलेला परिवार आहे.
अंत्यविधीच्या वेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी हजेरी लावून श्रद्धांजली अर्पण केली. यामध्ये राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी तसेच पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक आणि ग्रामस्थांचा समावेश होता.
सर्वांनी पटेल परिवाराच्या दुःखात सहभाग नोंदवत सुगराबी पटेल यांना भावपूर्ण निरोप दिला.

# नांदेडच्या भूमीवर होणारा 'शहीदी समागम' राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक: पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान

**आत्ताच एक्सप्रेस**
**नांदेड/ प्रतिनिधी/** सचखंड श्री हजूर साहिब ही केवळ श्रद्धेची जागा नसून त्यागाची पवित्र भूमी आहे. येथे आयोजित होणारा 'शहीदी समागम' हा केवळ एक धार्मिक सोहळा नसून तो राष्ट्रीय एकात्मतेचे जिवंत प्रतीक आहे, अशा शब्दांत पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम निमित्त, महाराष्ट्र शासनाचा अल्पसंख्याक विकास विभाग आणि राज्यस्तरीय समागम समितीच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथील मोदी मैदानावर भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री मान बोलत होते.

सेवेचा संदेश: सेवा हाच खरा धर्म असून, या सोहळ्याच्या माध्यमातून समता, बंधुता आणि करुणेचा संदेश देशभर पोहोचत असल्याचे भगवंत मान यांनी नमूद केले.पुढील पिढीसाठी प्रेरणा: गुरु तेग बहादुर साहिबजींचे कार्य, त्याग आणि विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे काळाची गरज आहे.पंजाब भवनचे नूतनीकरण: नांदेड येथील पंजाब भवनच्या अद्ययावतीकरणासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

महाराष्ट्र शासनाचा पुढाकार: इतिहास आता पाठ्यपुस्तकात

राज्य समागम समितीचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक यांनी महाराष्ट्र शासनाच्या निर्णयांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की,अभ्यासक्रमात समावेश: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री गुरु तेग बहादुर साहिबजींचा इतिहास शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

माहितीपटांचे प्रदर्शन: राज्यातील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये गुरुजींच्या जीवनावर आधारित माहितीपट आणि गीते दाखवून त्यांचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवला जात आहे.

सामाजिक सलोखा: या कार्यक्रमासाठी देशभरातून भाविक नांदेडमध्ये दाखल झाले



असून, यामुळे सामाजिक सलोखा अधिक दृढ होईल.

या भव्य सोहळ्याला राजकीय आणि धार्मिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते, ज्यात प्रामुख्याने गिरीश महाजन (जलसंपदा मंत्री),अशोक चव्हाण (माजी मुख्यमंत्री तथा खासदार),डॉ. अजित गोपछडे (खासदार),डॉ. तुषार राठोड (आमदार) संत ज्ञानी हरनाम सिंघ जी, महंत बाबुसिंग महाराज (पोहरादेवी), संत बाबा बलविंदर सिंघ जी यांसह अनेक संत-महंतांचा समावेश होता.

हा शहीदी समागम केवळ शीख समुदायापुरता मर्यादित न राहता, सर्वधर्मीयांना एकत्र आणणारा आणि गुरु तेग बहादुर साहिबजींच्या महान बलिदानाची आठवण करून देणारा एक ऐतिहासिक सोहळा ठरला आहे.

# शिवछत्रपती महाविद्यालय पाचोड येथे 'राष्ट्रीय बालिका दिन' व 'आंतरराष्ट्रीय शिक्षण दिन' उत्साहात साजरा




**आत्ताच एक्सप्रेस**
**पाचोड/ प्रतिनिधी/** येथील शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'राष्ट्रीय बालिका दिन' आणि 'आंतरराष्ट्रीय शिक्षण दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या दुहेरी औचित्याने आयोजित कार्यक्रमात भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून वसंतराव नाईक महाविद्यालय (संभाजीनगर) येथील डॉ. विकास चौधरी उपस्थित होते, तर अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी भूषविले.

राष्ट्रीय बालिका दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अंकिता काळे, दिपाली गायकवाड आणि महेक अनवर शेख या गुणवंत विद्यार्थिनींचा विशेष सत्कार करण्यात आला. मुलींना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करणे हा या मागचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमात विविध विषयांवर मान्यवरांनी प्रकाश टाकला:डॉ. विकास चौधरी: शिक्षणाची गरज केवळ नोकरीसाठी नसून सामाजिक आणि वैचारिक क्रांतीसाठी आहे. शिक्षणातूनच सर्वांगीण विकास साधता येतो, असे मत त्यांनी व्यक्त केले.

डॉ. गांधी बानायत: त्यांनी राष्ट्रीय बालिका दिनाच्या निमित्ताने महिलांसमोर असणाऱ्या विविध समस्यांवर भाष्य करत, त्या सोडवण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात यावर सविस्तर मार्गदर्शन केले.डॉ. हेमंत कुमार जैन: यांनी भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या जीवनप्रवासावर आणि भारतीय शास्त्रीय संगीतातील त्यांच्या अमूल्य योगदानावर माहिती दिली.

प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना आधुनिक युगातील शिक्षणाच्या विविध संधींची ओळख करून दिली. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता नवनवीन कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या सोहळ्याचे नेटके सूत्रसंचालन प्रा. विनोद कांबळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. विलास महाजन यांनी मानले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव, डॉ. सुरेश नलावडे, प्रा. सचिन कदम, गजानन इंगळे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या सामूहिक कवायतीचा जागर; घानेगाव तांडा आश्रम शाळेच्या विद्यार्थिनींनी पथनाट्यातून दिली 'दशसूत्री'ची हाक

**आत्ताच एक्सप्रेस**
**सोयगाव (प्रतिनिधी)** छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'दशसूत्री' कार्यक्रमांतर्गत यावर्षी प्रजासत्ताक दिनी संपूर्ण जिल्ह्यात एकाच वेळी देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत सादर केली जाणार आहे. या अभिनव उपक्रमाची जनजागृती करण्यासाठी प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा घानेगाव तांडा येथील विद्यार्थिनींनी प्रभावी पथनाट्य सादर केले.

या पथनाट्याने परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेत प्रजासत्ताक दिनाचा उत्साह द्विगुणित केला.

घानेगाव तांडा प्रशालेच्या विद्यार्थिनींनी आपल्या सशक्त अभिनयातून देशप्रेम, शिस्त, एकता आणि राष्ट्रीय कर्तव्य या मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. जिल्हाधिकाऱ्यांच्या संकल्पनेतील 'एकाच वेळी, एकच ताल' यानुसार होणाऱ्या सामूहिक कवायतीचे महत्त्व आणि त्यामागचा उद्देश विद्यार्थिनींनी अत्यंत प्रभावीपणे मांडला. पथनाट्यातील आशयपूर्ण संवाद आणि सादरीकरणामुळे उपस्थित नागरिक भारावून गेले होते.



जिल्हा प्रशासनाच्या दशसूत्री कार्यक्रमाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी या पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. २६ जानेवारी रोजी होणाऱ्या या ऐतिहासिक कवायत प्रकारात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. विद्यार्थिनींच्या या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

हा जनजागृतीपर कार्यक्रम यशस्वी करण्या साठी संजय पाटील (मुख्याध्यापक, माध्यमिक विभाग), दिवाकर लवांडे (मुख्याध्यापक, प्राथमिक विभाग) ,शिक्षक सुनील कवीश्वर, देवचंद बागुल, प्रवीण पवार, सलीम तडवी आणि सेवक आकाश पेंढारे यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे घानेगाव तांडा आणि परिसरातील नागरिकांमध्ये प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याबाबत मोठा उत्साह निर्माण झाला आहे.

## संक्षिप्त



## बाजारपेठेत तिरंग्याची लगबग; खरेदीसाठी नागरिकांची गर्दी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**तुमच्या शहराचे नाव भारतीय प्रजासत्ताक दिन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. २६ जानेवारीनिमित्त शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये आणि विविध संस्थांमध्ये जय्यत तयारी सुरू झाली असून, बाजारपेठेत तिरंगी वस्तूंच्या खरेदीसाठी मोठी गर्दी दिसून येत आहे.शहरातील मुख्य बाजारपेठेत ठिकठिकाणी तिरंगी वस्तूंची दुकाने थाटली गेली आहेत. यंदा केवळ झेंडेच नव्हे, तर लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांसाठी नवनवीन आकर्षक वस्तू उपलब्ध आहेत. यामध्ये प्रामुख्याने खालील साहित्याची मोठी विक्री होत आहे:

विविध प्रकारचे झेंडे: कापडी, सॅटीन आणि कागदी झेंड्यांसोबतच गाड्यांवर लावण्यासाठीचे छोटे स्टँड असलेले झेंडे उपलब्ध आहेत.

टोप्या आणि गळ्यातील रुमाल (स्कार्फ): शालेय विद्यार्थी आणि तरुणांमध्ये तिरंगी टोप्या आणि गळ्यातील रुमालांची मोठी क्रेझ पाहायला मिळत आहे. सॅटीन आणि कॉटनच्या रुमालांवर 'आय लव्ह माय इंडिया' आणि 'जय हिंद' अशा आशयाचे संदेश छापलेले आहेत.

बँड आणि मनगटी पट्ट्या: लहान मुलांसाठी तिरंगी रंगाचे रबरी आणि कापडी बँड पट्ट्या (Wristbands) आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत.

इतर साहित्य: बॅजेस, तिरंगी फुगे, टी-शर्ट आणि ध्वजवंदनासाठी लागणारे विशेष साहित्य यांचीही मोठ्या प्रमाणावर आवक झाली आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या परेडसाठी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी लागणारे बँड पथकाचे साहित्य, पांढरे गणवेश आणि लेझीम साहित्य खरेदी करण्यासाठी पालकांनी मुलांसह दुकानांमध्ये गर्दी केली आहे. विशेषतः छायाचित्रकार किरण खानापुरे यांनी टिपलेल्या छायाचित्रातून बाजारपेठेतील हा उत्साह आणि रंगांची उधळण स्पष्टपणे दिसून येत आहे.

गेल्या दोन दिवसांपासून ग्राहकांचा प्रतिसाद वाढल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. प्रजासत्ताक दिनानिमित्त दरवर्षी नवनवीन साहित्य येते, पण यंदा कापडी बॅजेस आणि गळ्यातील स्कार्फला सर्वाधिक मागणी आहे, असे एका स्थानिक विक्रेत्याने नमूद केले.

## विद्यार्थ्यांनी एकाग्रतेने अभ्यास करून विद्यार्जन करावे : सरपंच संतोष पाटील



**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर (प्रतिनिधी)** संपूर्ण तालुक्यात केवळ येरगी येथेच चालुक्यकालीन सरस्वतीचे प्राचीन मंदिर आहे. ही आपल्या गावासाठी अभिमानाची बाब आहे. सर्व विद्यार्थ्यांनी विद्येची देवता सरस्वती मातेला प्रसन्न करून घेण्यासाठी आणि जीवनात प्रगती करण्यासाठी एकाग्रतेने अभ्यास करून विद्यार्जन करावे, असे आवाहन सरपंच संतोष पाटील यांनी केले.

येरगी (ता. देगलूर) येथील ऐतिहासिक सरस्वती मंदिरात वसंत पंचमी तथा सरस्वती जन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

शुक्रवारी वसंत पंचमीचे औचित्य साधून येरगी येथील चालुक्यकालीन सरस्वती मंदिरात ग्रामस्थ आणि शालेय विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती. सरपंच संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या उत्सवाचे नेटके नियोजन करण्यात आले होते. यावेळी सरस्वती मातेच्या मूर्तीला वस्त्र अर्पण करून विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी सरस्वती स्तवन सादर केले आणि चांगली बुद्धिमत्ता प्राप्त व्हावी, यासाठी प्रार्थना केली.

या मंगल प्रसंगी सरपंच संतोष पाटील यांच्या वतीने शाळेतील सर्व मुला-मुलींना वही आणि पेन भेट स्वरूपात देण्यात आले. अनपेक्षित मिळालेल्या या भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पसरले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालाजी विद्यमवार यांनी केले. या सोहळ्याला गावातील महिला, पुरुष आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी खालील मान्यवरांनी पुढाकार घेतला. नागोराव चव्हाण (मुख्याध्यापक), वैशाली सागावे (सहशिक्षिका),महादेवी दाणेवार (सचिव, बालिका पंचायत राज समिती), अंगणवाडी सेविका: गंगामणी दारलावार, हाणमाबाई बरसमवार, मजुळा सिलमकुटवार, नागमणी बरसमवार, प्रणिता बरसमवार, मयना वाघमारे (PRC, बचत गट) या कार्यक्रमामुळे येरगी परिसरात भक्तीमय आणि उत्साही वातावरण निर्माण झाले होते.


# जालना शहर तिरंग्याच्या रंगात न्हाले


### प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रशासकीय इमारतींवर मनमोहक विद्युत रोषणाई

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**२६ जानेवारी, भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जालना शहरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. या राष्ट्रीय सणानिमित्त शहरातील प्रमुख शासकीय इमारतींवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून, संपूर्ण शहर रोषणाईने उजळून निघाले आहे.प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला जालना शहर महानगरपालिका, न्याय मंदिर (जिल्हा न्यायालय), जिल्हाधिकारी कार्यालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालय यांसारख्या महत्त्वाच्या प्रशासकीय इमारतींना तिरंगी विद्युत रोषणाईने सजवण्यात आले आहे. केशरी, पांढऱ्या आणि हिरव्या रंगाच्या या दिव्यांच्या माळांमुळे या इमारतींचे सौंदर्य रात्रीच्या वेळी अधिकच खुलून दिसत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर आणि पोलीस अधीक्षक कार्यालयाची इमारत लांबूनच नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. ही मनमोहक रोषणाई पाहण्यासाठी आणि तिचे छायाचित्र आपल्या मोबाईलमध्ये टिपण्यासाठी नागरिकांनी ठिकठिकाणी गर्दी केली होती. जालना महापालिकेने देखील शहराच्या मुख्य चौकांमध्ये आणि आपल्या मुख्य इमारतीवर दिमाखदार सजावट केली आहे.ही रोषणाई केवळ सजावट नसून देशाप्रती असलेल्या अभिमानाचे प्रतीक असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. उद्या सकाळी मुख्य ध्वजारोहण समारंभाने या उत्सवाची सांगता होईल, त्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे.





छायाचित्र: किरण खानापुरे

## एका कॉपीसाठी परीक्षा केंद्र रद्द करणे बेकायदेशीर; उच्च न्यायालय

जालना:बारावीच्या परीक्षेत केवळ एका विद्यार्थ्याकडे कॉपी सापडली म्हणून संपूर्ण कनिष्ठ महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र रद्द करण्याचा शिक्षण मंडळाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रद्द केला आहे. या निर्णयामुळे जालना जिल्ह्यातील जिजाऊ उच्च माध्यमिक विद्यालय सह इतर सहा जिल्ह्यांतील शैक्षणिक संस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.न्या. विभा कंकणवाडी आणि न्या. हितेन वेणेगावकर यांनी स्पष्ट केले की, एका विद्यार्थ्याच्या चुकीसाठी संपूर्ण संस्थेला दोषी धरणे मनमानी आणि नियमबाह्य आहे. मंडळाचा १८ डिसेंबर २०२५ चा आदेश रद्द करून, फेब्रुवारी २०२६ पासून ही केंद्रे पूर्ववत सुरू करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

## जालन्याचा कायापालट करण्यासाठी महेश धन्नावत यांचा '२६ कलमी' निर्धार

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जालन्याच्या विकासाला नवी दिशा देण्यासाठी नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष महेश धन्नावत यांनी एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. नव्या सहस्त्रकाच्या २६ व्या वर्षात पदार्पण करत असताना, शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी '२६ कलमी विकास कार्यक्रम' जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे. केवळ कागदी आश्वासने न देता, कायदेशीर मार्गाने हा लढा लढून जालना शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.प्रशासकीय लढा आणि कायदेशीर आक्रमकताड. धन्नावत यांनी स्पष्ट केले की, हा २६ कलमी कार्यक्रम केवळ एक मागणी नसून तो जालन्यातील नागरिकांचा अधिकार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी ते त्रिसूत्रीचा वापर करणार आहेत:प्रशासकीय पाठपुरावा: जिल्हाधिकाऱ्यांकडे नियमित अर्ज आणि निवेदने देऊन कामाचा आढावा घेणे.मानवाधिकार आयोग: नागरी हक्कांचे उल्लंघन झाल्यास थेट मानवाधिकार आयोगाकडे धाव घेणे.न्यायालयीन लढा: प्रशासकीय दिरंगाई झाल्यास न्यायालयात जनहित याचिका दाखल करून कामांना गती देणे.जिव्हाळ्याच्या प्रश्नांना सर्वोच्च प्राधान्यशहरातील नागरिकांच्या दैनंदिन आयुष्याशी निगडित प्रश्नांवर धन्नावत यांनी यापूर्वीच रान उठवले आहे. त्यांच्या या नवीन आराखड्यात खालील मुद्द्यांवर विशेष भर असेल:पाणीपुरवठा: शहरात दररोज आणि शुद्ध पाणीपुरवठा व्हावा यासाठी कायदेशीर संघर्ष.सांस्कृतिक वारसा: कृष्णराव फुलंब्रीकर नाट्यगृहाचे पुनर्निर्माण करून शहराची सांस्कृतिक ओळख जपणे.स्वच्छता व आरोग्य: कचरा व्यवस्थापन, भूमिगत गटार योजना आणि आरोग्य सेवांचे आधुनिकीकरण.२६ कलमी कार्यक्रमाचे मुख्य आकर्षणया विकास आराखड्यात शहराच्या २६ महत्त्वाच्या क्षेत्रांना स्पर्श करण्यात आला आहे. त्यातील प्रमुख विभाग खालीलप्रमाणे आहेत:क्षेत्रप्रस्तावित सुधारणानागरी सुविधारस्ते दुरुस्ती, पथदिव्यांची सोय आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था.पर्यावरणउद्यानांचे संवर्धन, मोकळ्या जागांचे रक्षण आणि वृक्षारोपण.शिक्षण व रोजगारमनपा शाळांचा दर्जा सुधारणे आणि स्थानिक तरुणांसाठी रोजगार संधी.सुरक्षामहिला सुरक्षा आणि शहरातील मुख्य चौकांत सीसीटीव्ही यंत्रणा.हा केवळ आराखडा नाही, तर वचनबद्धता आहेया उपक्रमाबद्दल बोलताना ड. महेश धन्नावत म्हणाले, हा कार्यक्रम म्हणजे जालन्यातील प्रत्येक नागरिकाच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिलेली एक गॅरंटी आहे. केवळ विनंत्या करून प्रश्न सुटत नसतील, तर कायद्याचे शस्त्र उपसून नागरिकांना त्यांचे हक्क मिळवून देण्यास आम्ही बांधील आहोत.जालन्याकरांच्या नजरा २६ जानेवारीकडेयेत्या २६ जानेवारी २०२६ रोजी या संपूर्ण २६ कलमी कार्यक्रमाची सविस्तर रूपरेषा जाहीर केली जाणार आहे. या योजनेमुळे जालना शहराच्या विकासाचा एक नवा अध्याय सुरू होण्याची चिन्हे दिसत आहेत. आता या उपक्रमाला प्रशासनाकडून किती प्रतिसाद मिळतो आणि नागरिकांचा सहभाग कसा राहतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.


## जाहीर प्रकटन

**(वारस हक्क प्रकरण)**

**तारीख:** २५/०१/२०२६

**ठिकाण:** साजा कु. पिंपळगाव, ता. घनसावंगी, जि. जालना.

तमाम जनतेस या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, मौजे कु. पिंपळगाव, ता. घनसावंगी येथील रहिवासी श्रीमती सरस्वती चंद्रकांत टेकाळे यांचे दिनांक ११/०३/२०१८ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या नावे असलेल्या शेतजमीन/मालमत्तेवर (खाते क्रमांक ४४७) खालील व्यक्तींनी त्यांचे कायदेशीर वारस म्हणून वारस हक्क नोंदणीसाठी अर्ज केला आहे.

प्रस्तावित वारसांची नावे:

१.मन्मथ चंद्रकांत टेकाळे (मुलगा, वय ३५)

२.महेंद्र चंद्रकांत टेकाळे (मुलगा, वय ३३)

३.रेणुका चंद्रकांत टेकाळे (मुलगी, वय ३८)

४.शंकर चंद्रकांत टेकाळे (मुलगा, वय ४०)

हरकतीबाबत सूचना: उपरोक्त वारस नोंदीबाबत कोणाचीही काहीही हरकत, दावा किंवा अधिकार असल्यास, त्यांनी हे प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संबंधित ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) किंवा तहसीलदार कार्यालय, घनसावंगी यांच्याकडे लेखी स्वरूपात पुराव्यासह सादर करावी.

विहित मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास, अर्जात नमूद केल्याप्रमाणे वारसांची नोंद सरकारी महसूल अभिलेखात (गाव नमुना ६) करण्यात येईल आणि त्यानंतर कोणाचीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**स्वाक्षरी/-**

**ग्राम महसूल अधिकारी (तलाठी)**

**साजा कु. पिंपळगाव, ता. घनसावंगी.**


## अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली अंबड तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी सतीश धुपे यांची निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**गणेश सपकाळ राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या संघटनात्मक बांधणीला अधिक वेग देण्यासाठी आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यासाठी, अंबड तालुकाध्यक्षपदी सतीश धुपे यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली. सतीश धुपे यांची ही निवड पक्षाचे कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, जालना जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण आणि माजी आमदार शिवाजीराव चोथे यांच्या प्रमुख उपस्थितीत व संमतीने करण्यात आली आहे. धुपे यांचा जनसंपर्क आणि गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाप्रती असलेली त्यांची निष्ठा लक्षात घेऊन त्यांच्या खांद्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

> माझ्यावर जो विश्वास पक्षाने टाकला आहे, त्या विश्वासाला तडा जाऊ न देता अजित दादांच्या नेतृत्वाखाली मी अंबड तालुक्यात पक्ष संघटना अधिक मजबूत करेन. जनतेचे प्रश्न सोडवणे हीच माझी प्राथमिकता असेल.
> **- सतीश धुपे (नवनियुक्त तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस, अंबड)**

निवडीचे मुख्य कारण आणि जबाबदारी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या मते, सतीश धुपे यांचे संघटन कौशल्य आणि सामाजिक कार्यातील सातत्यपूर्ण सहभाग हा आगामी काळात पक्षाच्या विस्तारासाठी फायदेशीर ठरणार आहे.

ध्येय-धोरणांचा प्रचार: शासनाचे लोककल्याणकारी निर्णय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे.युवा संघटन: तालुक्यातील युवकांना पक्षाच्या मुख्य प्रवाहात सामील करणे.जनसंपर्क: ग्रामीण भागातील जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी सक्रिय राहणे.



सतीश धुपे यांच्या निवडीची बातमी समजताच अंबड तालुक्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आणि समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी व पेढे वाटून आनंद साजरा केला. धुपे यांच्या निवडीमुळे तालुक्यात पक्षाला नवे चैतन्य मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

या निवडीबद्दल राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी सतीश धुपे यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.


## राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.परळी वैजिनाथ शा.अंबड

**(अवसायनात)**

मुख्य पत्ता- शाहू कॉलनी शिक्षक पतसंस्थेच्या वार सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,माजलगाव

०३ करवा कॉप्लेक्स आय.सी.आय.सी.आय . बँके समोर ,जालना बीड रोड अंबड

Email:- rajasthanimultistatecooperativgmail.com

जा.क्र./मु.का./२०२५-२६ दिनांक-२४/०१/२०२६

**जाहीर आवाहन**

राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. परळी वैजनाथ, शाखा अंबड (अवसायनात) राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. परळी वैजनाथ, शाखा अंबड येथील सर्व सभासदांना या जाहीर आवाहनाद्वारे सूचित करण्यात येते की,

१.संस्थेच्या अंबड शाखेमध्ये ज्या सभासदांनी लॉकर (Safe Deposit Locker) भाड्याने घेतलेले आहेत, अशा सर्व संबंधितांनी दिनांक १० फेब्रुवारी २०२६ पर्यंत अवसायक यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधावा.

२.संपर्क साधताना आपल्या लॉकर संदर्भातील सर्व आवश्यक कागदपत्रे आणि पुरावे सादर करणे अनिवार्य आहे.

३.विहित मुदतीत (१० फेब्रुवारी २०२६ पूर्वी) संपर्क न साधल्यास, आपल्या अनुपस्थितीमध्ये कायद्यानुसार पंचनामा करून सदरचे लॉकर उघडण्यात येईल.

४. त्यानंतर लॉकरमधील साहित्याबाबत किंवा इतर कोणत्याही स्वरूपाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

संपर्क पत्ता: ०३, करवा कॉम्प्लेक्स, आयसीआयसीआय बँकेसमोर, जालना-बीड रोड, अंबड. ईमेल: Email:- rajasthanimultistatecooperativgmail.com

**स्वाक्षरीत**

**सुरज जगदाळे**

**(अवसायक) राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. परळी वैजनाथ, शाखा अंबड.**


## कलेच्या जोडीला निर्व्यसनी जीवनशैलीच कलावंताला तारते!

### ज्येष्ठ शाहीर नानाभाऊ परिहार यांचा तरुण शाहिरांना मोलाचा कानमंत्र

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** कलावंत हा केवळ स्वतःसाठी घडत नसून तो समाजासाठी घडत असतो. समाजाचे देणे फेडण्यासाठी आणि आपली कला दीर्घकाळ टिकवण्यासाठी केवळ कलेवर प्रेम करून चालणार नाही, तर कलावंताने आपल्या शरीरावर, आरोग्यावर आणि जीवनशैलीवरही प्रेम करणे गरजेचे आहे. सुदृढ शरीर आणि निर्व्यसनी जीवनशैलीच कलावंताला खऱ्या अर्थाने तारते, असे प्रतिपादन ज्येष्ठ शाहीर नानाभाऊ परिहार यांनी केले.

जालना येथील जेईएस महाविद्यालयाच्या लोककला विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'शाहिरी प्रशिक्षण शिबिरात' ते बोलत होते.

यावेळी शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना नानाभाऊ परिहार यांनी शाहिरी परंपरेसोबतच चारित्र्य संवर्धनाचा मोलाचा सल्ला दिला. ते म्हणाले की:

शाहिरी हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ती लोकजागृतीची एक प्रभावी परंपरा आहे.शाहिरांच्या खांद्यावर समाजप्रबोधनाची मोठी जबाबदारी असते, त्यामुळे शब्दांइतकीच आपल्या जीवनपद्धतीची शुद्धताही महत्त्वाची आहे.

स्वच्छ आचार आणि विचारांच्या अधिष्ठानावरच कलेचा पाया भक्कम होतो.

केवळ व्याख्यानेच नव्हे, तर या शिबिरात प्रत्यक्ष सराव सत्रांवर (Practicals) विशेष भर दिला जात आहे. यामध्ये खालील बाबींचे प्रशिक्षण दिले जात आहे.शाहिरीची लय आणि ठेका: लोककलेचा आत्मा असलेल्या लयीचे ज्ञान.स्पष्ट शब्दोच्चार: शब्दांची फेक आणि स्पष्टता.

प्रभावी सादरीकरण: रंगमंचावरील वावर आणि सादरीकरणाचे तंत्र.या सराव सत्रांचे मार्गदर्शन व सूक्ष्म निरीक्षण प्रा. कल्याण उगले हे करीत आहेत. या शिबिरामुळे महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेल्या तरुण शिबिरार्थींना शाहिरीचे शास्त्र शुद्धरीतीने आत्मसात करण्याची संधी प्राप्त झाली आहे.




थोडक्यात सांगायचे तर... हे शिबिर केवळ गाणे शिकवण्यापुरते मर्यादित नसून, एक सुसंस्कृत आणि व्यसनमुक्त कलावंत घडवण्याचे व्यासपीठ ठरत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247

The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813